दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : ३५३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, रविवार, दि.०३ ऑगस्ट २०२५




## कुंटूर पोलीस ठाण्याच्या धडाकेबाज कारवाईने महसुल विभागाचा बुरखा फाटला




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०२, नांदेड :** नायगांव तालुक्यातील बरबडा येथील गोदावरी नदीच्या पात्रात सुरू असलेल्या अवैध रेती उपशावर कुंटूर पोलीस ठाण्याने मोठी कारवाई केली. तीन बोटी अवैधपणे रेती उपसा करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सपोनि विशाल भोसले यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी धाड टाकली. या कारवाईत तीनही बोटी (४५ लाख किंमतीच्या) जप्त करून त्यांना जिलेटिन स्फोटकांच्या सहाय्याने नष्ट करण्यात आले.

या कारवाईमुळे नायगांव महसूल विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळेच अशा अवैध वाळू माफियांना खुलेआम मुक्तसंचार मिळत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक दिवसांपासून स्थानिक नागरिकांकडून तक्रारी असूनही कोणतीही ठोस कारवाई होत नव्हती. मात्र सपोनि विशाल भोसले यांच्या धडाडीमुळे अखेर ही कारवाई घडून आली.या कठोर कृतीमुळे राजकीय पाठबळ असलेल्या वाळू माफियांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अशा अवैध धंद्यांवर पोलिसांकडून अजूनही कठोर पावले उचलली जातील, असे संकेत मिळाले आहेत.

## मुदखेडमध्ये आधार केंद्र नावालाच ; नागरिकांची मोठी गैरसोय

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०२, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरात असलेले आधार केंद्र केवळ नावापुरतेच उरले आहे असा आरोप नागरिकांनी केला आहे आपल्या सुविधांमुळे आधार कार्ड काढण्यासाठी तसेच दुरुस्तीसाठी होणाऱ्या अडचणींना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे

शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना अपंगांना संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना किंवा इतर सर्वच गरजू लाभार्थ्यांना अशा सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी आधार सक्तीचे केले आहे मात्र गेल्या अनेक महिन्यांपासून मुदखेड शहरांसह तालुक्यांतील केंद्र चालक असून सुद्धा या ठिकाणी नवीन आधार कार्ड व आधार दुरुस्ती करण्यात येत नाही.

मुदखेड मधील आधार केंद्र चालक हे फक्त आधार अद्यावत करून देणे व आधारला मोबाईल नंबर जुळून देण्याचे काम करत आहेत, नवीन आधार किंवा आधार दुरुस्ती करण्यासाठी नांदेड येथे जाण्याचा सल्ला मुदखेड येथील आधार केंद्र चालक देत आहे.

आपला कामधंदा रोजगार सोडून आधार कार्ड काढण्यासाठी नांदेड किंवा इतर ठिकाणी जावे लागत आहे, नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाल्यामुळे विद्यार्थ्यांना आधार कार्ड संबंधित कामांसाठी पालकांना देखील मनस्ताप भोगाव लागत आहे.

यामुळे मुदखेड शहर व तालुक्यातील नागरिकांना गैरसोय होत असून आधार केंद्र चालकांना संबंधित कार्यालयाने नवीन आधार कार्ड,आधार दुरुस्त करून देण्याची सूचना करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## पारनेर तालुक्यातील ५४ गावांचा डोंगरी विभागात समावेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** राज्य सरकारने जाहीर केलेल्या सुधारित यादीनुसार पारनेर तालुक्यातील ५४ गावांचा डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत समावेश करण्यात आला आहे. उपसचिव नि. भा. खेडकर यांनी दिनांक १३मार्च रोजी शासन निर्णय क्रमांक डोविका-२०२१, प्र.क्र. ५८/का.१४८२-अ अन्वये ही सुधारित यादी जाहीर केली आहे.

संबंधित गावांतील विद्यार्थ्यांना डोंगरी दाखल्याच्या माध्यमातून शैक्षणिक सवलती व नोकरीतील आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. ग्रामीण व डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात प्राधान्य, शिष्यवृत्ती, तसेच सरकारी सेवांमध्ये आरक्षण या सुविधांचा या निर्णयामुळे फफायदा होणार आहे. यामुळे या भागात सामाजिक व शैक्षणिक प्रगतीला चालना मिळेल, असा विश्वास स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

**भोयरे गांगर्डा, कडूस गावांवर अन्याय!**

चहूबाजूंनी डोंगर वेढा असलेल्या भोयरे गांगर्डा व कडूस गावांचा शासन निर्णयात समावेश न केल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे. हे गवे जिरायती पट्ट्यात असल्याने शासकीय अनेक योजनांपासून वंचित आहेत, तालुक्यातील शेवटचे टोक असलेल्या भोयरे गांगर्डा व कडूस या दोन गावांचा डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत समावेश न झाल्याने खरी गरज असून सुद्धा येथील विद्याथ डोंगरी दाखल्यांसह शिक्षण व नोकरीच्या सवलतींना मुकणार आहेत. येथील विकास देखील खुंटणार आहे.

**यादीत या ५४ गावांचा समावेश !**

भोंद्रे, ढोकी, सांगवी सूर्या, पिंपरी गवळी, वाळवणे बुद्रुक, पिंपरी पठार, धोत्रे बुद्रुक, पठारवाडी, जातेगाव, टाकळी ढोकेश्वर, गटेवाडी, पानोली, नारायण गव्हाण, विरोली, गोरेगाव, वडगाव दर्या, पाडळी दर्या, काकणेवाडी, खडकवाडी, सारोळा आडवाई, रायतळे, पळसपुर, पिंपरी जलसेन, नांदुर पठार, पुणेवाडी, वनकुटे, वडगाव गुंड, म्हसोबा झाप, अक्कलवाडी, राळेगण सिद्धी, मांडवे खुर्द, हत्तलखिंडी, चिंचोली,वारणवाडी,तास,पोखरी, कारेगाव, सिध्देश्वरवाडी, जाधववाडी, शहांजापूर, गारखिंडी, देसवडे, दरोडी, शेरी कोलंदर या ५४ गावांचा समावेश आहे.

# विदर्भात पावसाची विश्रांती, तापमानात वाढ!

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०२, नागपूर :**



विदर्भासह नागपुरात गेले दोन दिवस पावसाने पूर्णपणे विश्रांती घेतली आहे. आकाशात ढग असूनही पावसाचा मागमूस नाही, त्यामुळे नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. शनिवारी नागपुराचं कमाल तापमान ३३.४ अंश सेल्सियस नोंदवलं गेलं, जे सरासरीहून २.६ अंशांनी अधिक आहे. हवामान विभागानुसार, पुढील सात दिवस विदर्भात असाच उष्ण आणि दमट हवामानाचा अनुभव येणार आहे.

पावसाच्या अनुपस्थितीमुळे विदर्भात उष्णतेचा जोर वाढत चालला आहे. दिवसाढवळ्या उकाडा आणि रात्रीही दमटपणा यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. वारंवार ढगाळ वातावरण निर्माण होत असलं, तरी पाऊस काही कोसोंवर थांबतो आहे. यामुळे शेतकरी वर्गातही चिंतेचं वातावरण आहे, कारण खरीप हंगामासाठी आवश्यक असलेला नियमित पाऊस सध्या नाहीसा झालेला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात सध्या कोणतेही प्रभावी कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होत नसल्याने मोठ्या प्रमाणावर पावसाच्या हालचाली थांबल्या आहेत. त्याशिवाय, मान्सूनी वारे उत्तर भारताच्या दिशेने, हिमालयाच्या दिशेने सरकले आहेत. त्यामुळे मध्य भारत आणि विदर्भातील पावसाची शक्यता अधिकच कमी झाली आहे. यामुळे ऑगस्ट महिन्यात सरासरीहून कमी पावसाची शक्यता निर्माण झाली आहे.

या दरम्यान, काही भागांमध्ये स्थानिक ढगांच्या कारणाने हलक्याशा सरी पडू शकतात. मात्र, जोरदार किंवा व्यापक स्वरूपाच्या पावसाची शक्यता कमीच असल्याचं हवामान विभागाचं म्हणणं आहे. विशेषतः दैनंदिन गरजा आणि शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, नागरिकांनी पाण्याचा योग्य वापर करावा, असा सल्लाही हवामान विभागाने दिला आहे.

**पुढील सात दिवस पावसाविना**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भात पुढील सात दिवस पावसाची शक्यता कमी असून, ढगाळ वातावरण आणि वाढलेलं तापमान कायम राहणार आहे. उकाड्यामुळे शारीरिक त्रास जाणवण्याची शक्यता वाढल्याने नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. दरम्यान, काही भागांत विजांसह, हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# कोल्हापूर खंडपीठाच्या निर्णयाचे पंढरपुरात स्वागत !

## अधिवक्ता संघाने पेढे, जिलेबी वाटून केला आंदोत्सव




**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०२, पंढरपूर :** मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे सुरू व्हाव, यासाठी गेली ३५ ते ४० वर्षांहून अधिक काळापासून सुरू असलेल्या वकिलांच्या लढ्याला अखेर यश आले असून शुक्रवारी रात्री अधिसूचना जारी झाली आहे. त्यामुळे या लढ्यात मोलाचे योगदान दिलेल्या पंढरपूर अधिवक्ता संघाने शनिवारी (दि.२) येथील श्री विठ्ठल - रूक्मिणी मंदिरासमोर पेढे, जिलेबी वाटून आनंदोत्सव साजरा केला.

उच्च न्यायालयातील विविध प्रकरणांच्या कामकाजासाठी मुंबईला ये - जा करणे वकील, पक्षकार यांच्यासाठी वेळखाऊ आणि खर्चिक ठरत होते. भौगोलिकदृष्ट्याही गैरसोयीचे होत होते. त्यामुळे कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे, अशी मागणी होत होती. याकरिता गेली ४० वर्षांपासून विविध मार्गांनी आंदोलने तसेच पाठपुरावा सुरू होता. पंढरपूर अधिवक्ता संघाने या लढ्यात सातत्याने पुढाकार घेतला होता. ५५ दिवस कामकाजापासून अलिप्त राहून या विषयाकडे वकिलांनी राज्याचे लक्ष वेधले होते. तसेच कांही दिवसांपूर्वी पंढरपूर ते कोल्हापूर रथ यात्रा काढली होती.

कोल्हापूर खंडपीठासाठी अधिसूचना जारी झाली असून या निर्णयाचे अधिवक्ता संघाने जोरदार स्वागत केले. श्री संत नामदेव पायरी येथे अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड.विकास भोसले यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, सदस्यांनी भाविक, वारकऱ्यांना पेढे वाटत आनंदोत्सव साजरा केला. त्यानंतर मोटारसायकल रॅलीद्वारे येथील जिल्हा सत्र न्यायालयासमोर येऊन फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. तसेच सर्व न्यायाधीश, न्यायालयीन कर्मचारी, वकील, पक्षकार अशा सर्वांना पेढे, जिलेबी वाटप करण्यात आली.

यावेळी अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड.विकास भोसले, माजी अध्यक्ष वसंत भादुले, ॲड. अर्जून पाटील, ॲड. राजेश चौगुले, ॲड.किरण घाडगे, ॲड. धनंजय पवार, ॲड. दत्तात्रय पाटील, ॲड.शशीकांत घाडगे, ॲड. दादासाहेब देशमुख, ॲड.एम.बी. शिंदे, ॲड. संजय व्यवहारे, ॲड. शरद पवार, ॲड.गणेश चव्हाण, ॲड.एस. एच. गायकवाड, ॲड. वर्षा हिरणवाले, ॲड. धनश्री घाडगे, ॲड. विकास सरवळे, ॲड. संजय रोंगे, ॲड. संतोष नाईकनवरे आदी उपस्थित होते. दुपारी वकील कक्षात या लढ्यासाठी योगदान दिलेल्या ज्येष्ठ वकिलांचा गौरव करण्यात आला. यावेळी अनेकांची भाषणे झाली.

कोल्हापूर उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला आहे. वकील व पक्षकारांचे मुंबईतील हेलपाटे वाचतील. खर्चाची, वेळेची बचत होईल. प्रलंबित खटले तातडीने चालविले जाऊन न्याय सुलभ, जलद मिळू शकेल. नवोदित वकील मंडळींसाठी कोल्हापूर खंडपीठ ही एक फार मोठी संधी म्हणावी लागेल. आपल्या पंढरपूर तालुक्यासाठी जनतेला याचा निश्चितच फायदा होणार आहे.

**- ॲड. विकास भोसले, अध्यक्ष**

**न्याय सुलभ होणार...**

मुंबईसारख्या शहरात जाऊन न्याय मिळवणे वकिलांसह सामान्य पक्षकारांसाठी नेहमीच खर्चिक व कठीण ठरत होते. आता कोल्हापूर बेंचच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणांची सुनावणी स्थानिक पातळीवर होणार असून न्यायप्रक्रिया अधिक वेगवान, सुलभ आणि सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणारी ठरेल. अनेक वकिलांसाठी यासाठी संघर्ष केला असून त्याला मिळालेले हे यश म्हणजे वकिलांच्या चिकाटी, संयम आणि एकजुटीचा विजय आहे.

**- ॲड.वसंत भादुले, ज्येष्ठ वकील**

# दिव्या देशमुख हिच्या बुद्धिमत्ता आणि चिकाटीसाठी राज्य शासनाची कौतुकाची थाप!

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज नागपूर येथे २०२५च्या FIDE महिला विश्वचषकाची विजेती भारताची पहिली महिला ग्रॅन्डमास्टर दिव्या देशमुख यांचा भव्य 'नागरी सन्मान सोहळा' संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र शासनातर्फे ₹३ कोटीचा तर महाराष्ट्र चेस असोसिएशनमार्फत ₹११ लाखांचा धनादेश देऊन दिव्या देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.




मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी गौरवोद्गार काढताना सांगितले की, केवळ १९ व्या वर्षी हा जागतिक किताब पटकावत दिव्याने संपूर्ण देशाचा सन्मान वाढवला आहे. चीनचे वर्चस्व मोडून दोन भारतीय कन्या अंतिम फेरीत पोहोचल्या आणि त्या रोमहर्षक लढतीत दिव्याने कोनेरू हंपी यांच्यावर विजय मिळवला. नागपूरच्या कन्येची ही ऐतिहासिक कामगिरी सर्वांसाठी अभिमानाची असून लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी ठरेल, म्हणूनच राज्य शासनाने हा सन्मान सोहळा आयोजित केला आहे.

सातव्या वर्षी बुद्धिबळाचा हा प्रवास सुरू करून दिव्याने एकेक शिखरे पादाक्रांत करत सातत्याने प्रगती केली. प्रशिक्षकांची मेहनत, कुटुंबाचा पाठिंबा आणि सर्वांचा आशीर्वाद यामुळेच हा यशस्वी प्रवास शक्य झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. दिव्याच्या योगदानामुळे नागपूर आणि महाराष्ट्र बुद्धिबळ विश्वामध्ये सन्मानाने ओळखले जात असल्याचा गौरव त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रामध्ये जागतिक बुद्धिबळ स्पर्धा घेण्यासाठी सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल, असेही जाहीर केले. क्रीडा क्षेत्रासाठी पोषण, प्रशिक्षक, फिजिओथेरपीसह आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रशिक्षणव्यवस्था राज्य सरकार तयार करत आहे. यासोबतच खेळाडूंच्या विकासासाठी विविध माध्यमातून प्रोत्साहन देण्याचे धोरण राबवले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार कृष्णा खोपडे, आमदार डॉ. परिणय फुके, आमदार संदीप जोशी, आमदार अभिजीत वंजारी,माजी आमदार गिरीश व्यास, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, ग्रॅंडमास्टर दिव्या देशमुख यांचे आई-वडील व इतर मान्यवर उपस्थित होते.




## खरी डिजिटल साक्षरता...

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारताने कम्प्युटर युगात पहिले पाऊल टाकले तेव्हा सर्वसामान्यांना कम्प्युटर ही गोष्ट गूढ आणि जणू जादूच वाटायची. 'बटण दाबल्यावर काहीतरी बिघडेल' अशी भीती मनात असायची. परंतु आता कम्प्युटर हे केवळ यंत्र राहिलेले नाही. ते माणसाच्या विचारविश्वात शिरले आहे. अर्थात, ही वाटचाल एक दिवसात घडलेली नाही. विसाव्या शतकाच्या अखेरीस, कम्प्युटरविषयी जनसामान्यांमध्ये असणारी अनामिक भीती, शंका, आणि संकोच दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एमएस-सीआयटी हा कम्प्युटर साक्षरतेचा मूलभूत अभ्यासक्रम सुरू केला. हा अभ्यासक्रम म्हणजे ग्रामीण ते शहरी, शिक्षक ते नोकरदार, तरुण ते गृहिणी, सर्वांसाठी एक नवा अध्याय होता. कोकणातील एखादा शिक्षक, छत्रपती संभाजीनगरमधील शेतकऱ्याचा मुलगा, नागपूरमधील घरकाम करणारी महिला, पुण्यातील छोटा व्यापारी - सगळ्यांनी कम्प्युटर शिक्षणाच्या या प्रवासात पहिले पाऊल टाकले. कम्प्युटरला बिचकणारा समाज आता आत्मविश्वासाने त्याच्या कळा दाबू लागला. त्या काळात डिजिटल साक्षर ही ओळखच प्रतिष्ठेची बाब होती.

परंतु, आता आपण एका नवे वळण घेतले आहे. माहिती व तंत्रज्ञानाचा वापर केवळ साधन म्हणून नसून, निर्णय घेण्याच्या क्षमतेशी जोडला गेला आहे. कृत्रिम प्रज्ञा (एआय), मोठ्या प्रमाणावर भाषिक विश्लेषण करणारी उपकरणे, चॅटजीपीटी आणि ध्वनिचित्र विश्लेषण, हे सारेच शिक्षणात प्रवेश करत आहेत. पण हे करताना आपण मूलभूत प्रश्न विचारायला हवा - आपली शिक्षणव्यवस्था या बदलांसाठी मानसिक, बौद्धिक आणि व्यावहारिकदृष्ट्या सज्ज आहे का? शाळा-महाविद्यालयांमध्ये कम्प्युटर विषय असतो, पण त्या विषयाचे शिक्षण देणारा शिक्षक नसतो. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कम्प्युटर लॅब आहे, पण त्याचा स्विच क्वचितच चालू होतो. शहरी कॉलेजांत आधुनिक फळ्यांवर चित्रफिती दाखवल्या जातात, पण त्या मागे संकल्पना स्पष्ट करणारा शिक्षकच अस्पष्ट असतो. म्हणजे आपण साधने घेतली, पण संकल्पनांमध्ये कमकुवत राहिलो. याच काळात विद्यार्थ्यांच्या हातात मोबाइल आला, डेटा आला, आणि इंटरनेटवरची सर्व माहिती सहज उपलब्ध झाली. पण ही माहिती त्यांच्या विचारक्षमतेला पोषक ठरत आहे का? की केवळ 'तयार उत्तर' मिळवून, न विचार करता स्वीकारायची सवय त्यांना लागली आहे?

आज शाळा, कॉलेजांत ऑनलाइन शिक्षण, 'कम्प्युटर शिक्षण' आदी घोषवाक्ये सतत ऐकायला मिळतात. पण प्रत्यक्षात शिक्षकांना शासनाच्या 'दिक्षा', 'स्वयं', 'पीएम ई-विद्या' यांसारख्या व्यासपीठांची माहिती आहे का? ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी, मोबाइल डेटा, स्मार्टफोन, कम्प्युटर अक्षरज्ञान हे अजूनही आव्हान आहे. शहरांमध्येही ही स्थिती फारशी वेगळी नाही. अनेक शिक्षक कम्प्युटर शिक्षणावर विश्वास ठेवतात, पण प्रत्यक्षात त्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात मागे पडतात. दुसरीकडे, विद्यार्थी वर्ग अधिक डिजिटल झाला आहे, परंतु अधिक अभ्यसनशील, विचारशील वा सर्जनशील झालेला नाही. माहितीचा स्फोट झाला असला तरी ज्ञाननिर्मितीचे प्रमाण घटले आहे. याला कारण ठरत आहेत चॅटजीपीटीसारखी साधने... जी उत्तरे तयार करून देतात. अशा साधनांचा वापर होणे चुकीचे नाही, पण त्यांच्यावर अवलंबून राहणे चुकीचे आहे. एका नामांकित कॉलेजात असेच घडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अभ्यास प्रबंधाची भाषा, संरचना आणि उदाहरणे इतकी उच्च प्रतीची होती, की ती त्या विद्यार्थ्यांच्या पातळीला शोभणारीच नव्हती. चौकशीनंतर समजले की, सर्व प्रबंध एआय साहाय्यकाद्वारे तयार केलेले होते. हे पाहून शिक्षणसंस्थेने विद्यार्थ्यांना दोषी ठरवले, पण खरा दोष कोणाचा? शिक्षणपद्धतीने त्यांना हे साधन कसे वापरायचे हे शिकवले नव्हते. शिक्षकांनाही याची माहिती नव्हती, प्रशिक्षण नव्हते. आज शिक्षण फक्त 'माहिती देणे' इतकेच मर्यादित राहिले आहे का? शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट चिंतन, चर्चा आणि चिरंतन जिज्ञासा नाही का? विद्यार्थ्याला जर कुतूहलच नसेल, तर मग त्याला डिजिटल यंत्रातून आलेली उत्तरे फक्त 'आशय' देतील, अर्थ नाही.

# 'रुळा'नुबंध...!

बुलडाणा जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये रेल्वेमार्ग नाही. त्यामध्ये आमच्या बुलडाणा तालुक्याचीही तीच गत. रेल्वे प्रवासासाठी जायचे असल्यास गावापासून मलकापूर, शेगाव, नांदुरा येथे जावे लागायचे. अथवा मराठवाड्यातील जालना येथे जावे लागे. महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत रेल्वे प्रवासाचा योग आलाच नाही. फार तर तालुक्याच्या ठिकाणापर्यंत शैक्षणिक कामा निमित्त जाण्याचा योग यायचा. माझा रेल्वे प्रवासाचा पहिला प्रसंग आला, तो डीएडचा मित्र शेख शब्बीरसोबत...! त्याला बारावीत उत्कृष्ट गुण मिळाले होते. त्यावेळेस आझाद कॅम्पस पुणे या संस्थेने त्या वर्षी अर्थात २००७ ला अल्पसंख्याक आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना पाच हजार रुपये शिष्यवृत्ती जाहीर केली होती. त्याचे मुख्यालय पुणे येथे आहे. म्हणून पुणेला जाण्यासाठी स्वस्त प्रवास जर कुठला तर तो म्हणजे रेल्वेप्रवास म्हणून त्या रकमेचा चेक आणण्यासाठी मी त्याच्यासोबत मलकापूर स्टेशन वरून महाराष्ट्र एक्सप्रेस या ट्रेनने गेलो होतो आणि तोही विना आरक्षित अर्थात जनरल बोगीत. जनरल बोगीमधील प्रवास म्हणजे कमालीची गर्दी अक्षरशः पाय ठेवायला जागा नव्हती. त्यात थंडीचे दिवस.असा लांबचा आणि रेल्वेचा प्रवासकरण्याची पहिलीच वेळ. प्रवासात सोबत काय घ्यावे याचीही पूर्ण कल्पना नव्हती. एक बॅग घेऊन थोडंफार चिवडा, चटणी भाकर बांधून प्रवासास निघालो. एकाच बॅगेत दोघांचे सामान भरले. थंडी पासून संरक्षण म्हणून दोघांसाठी एकच श्वाल सोबत होती. मलकापूर भुसावळ जळगांव पाचोरा नांदगाव पर्यंत फारशी थंडी नव्हती. मनमाड नंतर मात्र थंडी जाणवायला लागली. कसातरी थंडीत कुडकडत प्रवास करत सकाळी पाच वाजता पुणे स्टेशनला उतरलो.विचारपूस करत-करत साधारण सात ते आठ किलोमीटर स्टेशन ते आझाद कॅम्पस चा प्रवास पायीच केला. शिष्यवृत्तीच्या चेकचे काम आटोपून पुण्यातील महत्त्वाचे व ऐतिहासिक वस्तूपैकी दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर, शनिवारवाडा, लाल महाल बघितला आणि परत महाराष्ट्र एक्सप्रेसनेच रात्री साधारण अकरा वाजता गावाकडे येण्यास निघालो.सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत मलकापूरला पोहोचलो. असा हा सन २००८ मधील हा रेल्वेचा हा पहिला प्रवास..!

महाविद्यालयीन व व्यावसायिक शिक्षण पूर्ण झाल्यावर, काही दिवस खाजगी शाळेत शिक्षक म्हणून नोकरी केल्यानंतर भारतीय डाक विभागामध्ये नोकरींसाठी अर्ज केला. त्यातील पोस्ट ऑफिसची दुसरी शाखा अर्थात रेल डाक सेवा एल विभाग येथे छटाई सहाय्यक या पदावर रुजू झालो. भुसावळ म्हणजे रेल्वेचे माहेरघर अन पहिली ड्युटी रेल्वे प्लॅटफॉर्म क्रमांक तीनच्या मेल ऑफिस मध्ये होती. पुन्हा रेल्वेशी नाळ जुळली ती तब्बल पण तीन ते साडे तीन वर्षानंतर. ड्युटीच्या निमित्ताने रेल्वे रुळाची नाळ जुळली ते कायमचीच. आमच्या कार्यालयातील




ड्युटीच्या प्रकारातील एक प्रकार एक ड्युटीचा प्रकार म्हणजे सेक्टनची ड्युटी.थोडक्यात असे की, आमच्या विभागाचे नाव रेल डाक सेवा एलविभाग. तर हा एल म्हणजे आमच्या विभागाची ओळख म्हणून ठेवलेले नाव.या एलच्या पुढे जसे कि,एल-२९, एल-३५, एल-१९, एल-१२ एल-२७, एल-६ एल असे हे सेक्शनची नावे. ढोबळमनाने सांगायचे झाल्यास भुसावळ पासून रेल्वेत ड्युटी करत पुणे, मुंबई, सुरतला जाणे. त्याच ट्रेनने परत भुसावळला येणे. ड्युटीचे स्वरूप काय तर,मागील सेक्शनचे अर्थात नागपूर, भोपाल, ग्वालियर, जबलपूर येथील कर्मचाऱ्यांकडून चार्ज घेऊन भारतीय डाक विभागाच्या बंद बॅग, टपाल बॅग रेल्वे प्लॅटफॉर्म वरील आमच्याच कार्यालयात उतरवणे. जसे कि,जळगाव आर एम एस, चाळीसगाव टीएमओ, मनमाड टी एम ओ, नाशिक आर एम एस, कल्याण आर एम एस व अंतिम स्टेशन अर्थात मुंबईला संपूर्ण टपाल बॅग उतरवून विश्रांतीसाठी रेस्ट हाऊसला जाणे. त्याच ट्रेनने परत टपाल बॅग उतरवणे, चढवणे ही क्रिया परत भुसावळ पर्यंत येणे. तसेच पुणे,सुरत ची त्याच प्रकारच्या ड्युटीचे स्वरूप दिसून येते. यासाठी ४० सीटर स्पेशल अथवा ९० सीटरची बोगीज रेल्वे बोर्डाकडून रेल डाक सेवेसाठी भाडेतत्त्वावर पुरवण्यात आलेल्या आहे. त्याला कार्यालयीन भाषेत मेलव्हॅन म्हणतात. या बोगीमध्ये साधारण तीन किंवा चार कर्मचारी कार्यरत असतात. साध्या भाषेत दोन बाबू व दोन शिपाई.सिंगल हॅन्ड सेक्शन ड्युटीसाठी एक बाबू व दोन शिपाई असे तीन कर्मचारी बुक केलेले असतात. आमच्या कार्यालयातील भाषेत मेल एजंट अर्थात छटाई सहाय्यक किंवा मेलगार्ड व व्हीपी-१, व्हीपी-२ म्हणजेच एमटीएस कर्मचारी यांचा समावेश असतो. सारांश रूपाने ट्रेनमध्ये भुसावळ ते पुणे, भुसावळ ते मुंबई व परत भुसावळ अर्थात मुख्यालयात परत यावे लागते. ही सर्व साधारण सेक्शनच्या ड्युटीची ढोबळ मनाने संकल्पना..!

काही कार्यालय हे रेल्वे प्लॅटफॉर्मवर आहेत त्यांना आर एम एस म्हणून ओळखल्या जाते.जे रेल्वे प्लॅटफॉर्म पासून काही अंतरावर पोस्ट ऑफिसच्या इमारतीमध्ये असल्यास सॉर्टिंग ऑफिस म्हणून ओळखल्या जाते. भुसावळचे कार्यालय प्लॅटफॉर्मवर असल्यामुळे भुसावळ आर एम एस अशी ओळख आहे. तर माझाही रेल्वेशी या सेक्शनच्या ड्युटी निमित्ताने संबंध आलाच. अर्थात रेल्वे रुळाशी नाळ जुळली. मुंबई लाईनच्या ड्युटीचे सेक्शनच्या सेटप्रमाणे चार सेट आहेत. महिन्यातून साधारण सात ते आठ ड्युटी येतात. म्हणजेच चारच्या पटीत ड्युटीचे नियोजन केल्यास व एका ड्युटीचा म्हणजेच रेल्वे प्रवासाच्या किलोमीटरचा हिशोब केल्यास भुसावळ ते मुंबई, भुसावळ ते पुणे, भुसावळ ते सुरत जाणे व येणे असा साडेआठशे ते नऊशे किलोमीटरचा प्रवास होतो. एका महिन्याच्या सात ते आठ ड्युटींचा हिशोब केल्यास जवळपास मुंबईचा महिन्याभराचा सहा हजार ऐकशे साठ किलोमीटरचा प्रवास होतो. महिना ऐकतीसचा असल्यास कधी-कधी आठ ड्युटी झाली तर ७ हजार चाळीस किलोमीटर एवढा प्रवास होतो. पुणे लाईन चा अर्थात भुसावळ ते पुणे व पुणे ते भुसावळ या सेक्शन च्या ड्युटीचा महिन्याभराचा सात हजार आठसे बहात्तर किलोमीटरचा प्रवास होतो.आणि वेळेचा हिशोब केल्यास भुसावळ ते पुणे, मुंबई व सुरत या ड्युटीचा महिन्याभरातील एकूण तासापैकी अडीचशे ते पावणेतीनशे तास घराबाहेर राहावे लागते त्याचप्रमाणे महिन्याभरात चौदा ते पंधरा दिवस कर्मचारी घराबाहेर ड्युटीवर कार्यरत असतात.

आमच्या ड्युटीप्रमाणेच इतर रेल्वे कर्मचाऱ्यांचीसुद्धा याच प्रमाणे कामाची रुपरेषा ठरलेली असते. त्यांचाही असाच रेल्वे रुळासी संपर्क येतो. प्रथम श्रेणी अधिकारी, द्वितीय श्रेणीअधिकाऱ्यांपेक्षा तृतीय श्रेणी कामगार व चतुर्थश्रेणी कामगार यांचा ड्युटी निमित्त रेल्वे रुळाशी जास्त संबंध येतो. कितीतरी काळ हे कर्तव्य बजावण्यासाठी घरा घराबाहेर असतात. रेल्वे प्रवास हा चोवीस तास चालू असतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांची ड्युटीही चोवीस ताशी घड्याळा प्रमाणे चालते. शिफ्टनुसार किंवा सेटनुसार चालणारी ड्युटी जसे की, सकाळी सात ते तीन, सायंकाळी पाच ते रात्री बारा, अथवा संध्याकाळी सहा ते दुसऱ्या दिवशी सकाळी सहा पर्यंत असे ड्युटीचे स्वरूप असते.त्याचप्रमाणे ट्रेनवरील ड्युटीही त्याच प्रकारची असते. रात्री-अपरात्री अर्थात मुख्यालयाला ट्रेन जेव्हा येईल तेव्हा जसे कि, पंजाब मेल रात्री साडेअकरा असो अथवा हावडा मेल (व्हाया प्रयागराज) सकाळी चारला येवोअथवा गोवा एक्सप्रेस सकाळी साडेआठला व नऊला येवो ड्युटीला हजर राहावे लागते.यासाठी सर्व कर्मचारी जीवाचा आटापिटा करतात.कार्यालयात हजर होतात. सही मारतात व ड्युटीसाठी निघतात.

अशाप्रकारे सर्व रेल्वे विभागातील कार्यरत कर्मचारी हे जीवन जगण्यासाठी, टिचभर पोटासाठी, कौटुंबिक गरजा, लेकरं बाळांचे शिक्षण, विवाह अर्थात सांसाराचा गाडा ओढण्यासाठी धडपड करत असतात. रात्री अपरात्री कर्तव्य बजावण्यासाठी सज्ज असतात. ज्याच्या त्याच्या विभागानुसार जसे की पार्सल,रेल डाक सेवा, प्रवाशांचे तिकीट बुक करण्यापासून तर रेल्वे सुरक्षेसाठी कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी अथवा ट्रॅकमन रेल्वे प्लॅटफॉर्मवर, रुळावर अथवा ट्रेनमध्ये डोळ्यात तेल घालून कार्य करत असतात. देशसेवे बरोबर राष्ट्र विकासास हातभार लावत असतात. अशी ही सेवा भारतीय डाक विभागाची जरी दुसरी शाखा असली तरी रेल या शब्दामुळे व रेल डाक सेवेतील सेक्शन ड्युटीच्या निमित्ताने रेल्वेप्रवास, प्लॅटफॉर्म व रुळाशी संबंध जुळून आला. अर्थात रेल्वेशीरुळानुबंधाच्या जुळवून आल्या गाठी...!

**समस्त रेलकामगारांना समर्पित..!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि. बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

## मैत्रीचे नाते



मनात असतो विचारांचा काहूर
तरी शब्दा येत नाहीत ओठांवर
खूप काही सांगायचा असत
तेव्हा नसत कोणीही आपल्यासमोर

किती वेळा वाटत की आता
सोडून द्यावेत हे पाश मायेचे
पण नाही सुटत ते रेशमी बंध
आपल्याच नात्यातील कर्तव्याचे

रक्ताची नाती तर
रेडीमेड मिळतात
आणि बाकीची म्हणे
कस्टमाइज़्ड असतात

तरी इट्स माइ चाय्स हा
असतो निव्वळ एक भास
सगळा आधीच असत
त्यानी ठरवलेल खास

त्यातूनच मग जुळतात का
काहींचे सूर अनॉखे
आणि त्यालाच म्हणायचे का
आपण मैत्रीचे नाते?

# सुंदर नाते मैत्रीचे

मैत्री पाहायला गेल तर अगदी दोन अक्षरी शब्द पण या दोन अक्षरी शब्दात जगातील सर्वात पवित्र अशी भावना लपली आहे. जगातील सर्वात सुंदर नातं कोणतं असेल तर ते मैत्रीचं नातं, कारण या नात्यात कोणताही स्वार्थ नसतो. मैत्री कधीही ठरवून होत नाही. मैत्री कशी, कधी, कोणाशी होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मैत्रीला काळाची, वेळेची, वयाची बंधने नसतात.



मैत्रीत जात, धर्म, वर्ण, लिंग असा कोणताही भेदभाव नसतो. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत कोणाशीही मैत्री होऊ शकते. समान छंद, समान आवडी, समान विचारधारा आणि परस्परांचे स्वभाव जुळले की मैत्री जमते. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते महत्वाचे आहे. जगात मित्र नाही असा कोणताच व्यक्ती नाही. भारतात तर पौराणिक काळापासून मैत्रीला महत्व आहे. श्रीकृष्ण सुदामा यांची तर मैत्री अजरामर आहे. काळ बदलला तरी मैत्रितील पवित्र भावना आजही तीच आहे. मैत्री ही प्रामाणिक आणि तरळ भावना आहे. मित्रा समोरच आपण आपलं मन मोकळं करू शकतो. मानवी जीवनात क्षणाक्षणाला काहीना काही घडत असते. काही चांगले काही वाईट घडत असते. या बऱ्या वाईट घटनांच्या अपरिहार्यतेचा विचार करता मैत्री आणि मित्र आवश्यक असतातच. मंदिरातील देवासमोर जसे आपण आपले मन मोकळे करतो तसेच आपण आपल्या खऱ्या मित्रा जवळही आपले मन मोकळे करतो. आजकाल मैत्रीतही हिशोबीपणा आला आहे. मैत्रीतही स्वार्थ आला आहे. त्यामुळे मैत्रिची पवित्र भावना काळवंडू लागली आहे. स्वार्थाच्या अंधारात मैत्री चाचपडू लागली आहे त्यामुळे मैत्रीतून मिळणारा आनंदही कमी होऊ लागला आहे. स्वार्थी मित्र आपण सहज ओळखू शकतो. स्वतःच्या स्वार्थासाठी जवळ येणारे मित्र आपल्याला संकटकाळात मदत करत नाहीत. जो आपल्याला संकटकाळात मदत करतो तोच खरा मित्र असतो. जीवनाच्या प्रवासात अनेक मित्र भेटतात, निघून जातात पण मनाने जुळलेले मित्र मात्र कायम राहतात. मित्रांमुळे आपल्याला व्यवहार कळतो. अडचणी सुटतात, संकटावर मात करण्याचे धाडस निर्माण होते.

मैत्रीमुळे आपली निर्णय क्षमता वाढते. इतकेच काय तर मैत्रीमुळेच माणूसकी जिवंत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. केवळ सहवास म्हणजे मैत्री नव्हे, सहवास आणि मैत्री यात फरक आहे. सहवासाने मैत्री फुलत जाते हे जरी खरे असले तरी मैत्रीसाठी मित्र दररोज जवळ असावाच असे काही नाही. अनेकदा जिवलग मित्र जवळ नसतात. कित्येक दिवस त्यांच्यात बातचीत होत नाही तरीही त्यांची मैत्री कायम असते अगदी श्रीकृष्ण सुदाम्या सारखी. पु .ल. देशपांडे यांनी मैत्री विषयी एक फार सुंदर कविता लिहिली आहे. ते लिहितात

रोज आठवण व्हावी असे काही नाही.
इतकंच काय रोज बोलणं व्हावं असंही काही नाही.
पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव असणे ही झाली मैत्री.

अशी सरळ सोपी पण घट्ट मैत्री टिकवणं, निर्माण करणं फार कठीण नाही आणि फार सोपंही नाही. मनाचा एवढा हळवेपणा नवरा बायकोच्या नात्यामध्ये नाही हो येत, तिथे मित्रच असावा लागतो. कारण इतर कोणत्याही नात्याला आपण नाव दिले की, त्याबरोबर कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आणि शारीरिक बंधने येतात. या नात्याला मात्र कसले नाव नाही त्यामुळे कसली बंधनंही नाहीत किंबहुना ती तशी नसावीतही. मित्रांशी वाट्टेल त्या विषयावर आपण गप्पा मारू शकतो, मोकळे होऊ शकतो, तिथे स्त्री - पुरुष, जात - पात, वय काही आडवे येत नाही. मनसुबा बनून जातो आणि मन आनंदी होतं.

शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी बसणं महत्वाचं. ज्यांनी हे जाणलं त्यांनी माणसातलं माणूसपण जाणलं. पु ल नी मैत्री विषयी किती छान शब्दात लिहिलंय. मैत्री अशीच असते अगदी सुंदर. ज्याने मैत्रीचे सुंदर नाते जपले त्याचे जीवन आनंदाने फुलून गेले. मैत्रीसारखे सुंदर नाते या जगात दुसरे कोणतेही नाही, ज्याला मैत्री समजली त्याला जीवन समजले.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अवैधरित्या बनावट देशी दारु वाहतूक करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूरची कारवाई



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, वरोरा (चंद्रपूर) :** स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर चे पथक पोलीस ठाणे वरोरा हद्दीत पेट्रोलींग करीत असताना त्यांना गोपनिय बातमीदारांकडून खात्रीशिर माहिती मिळाली की, यवतमाळ जिल्हयातून वरोरा मार्गे दारुबंदी जिल्हा वर्धा येथुन अवैध दारुची वाहतुक पिकअप वाहनाने होणार आहे. यावरुन स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर चे अधिकारी व अंमलदार यांनी वेगवेगळया ठिकाणी नाकाबंदी केली असता मौजा माढेळी वरोरा रोडवरील नाकाबंदी पॉईन्टवर एक पिकअप वाहन क्रमांक एमएच २७-एक्स-८२१० येतांना दिसल्याने त्यास थांबवून पंचासमक्ष सदर वाहनाची झडती घेतली असता सदर वाहनामध्ये बनावट रॉकेट देशी दारुचे ९० एमएल च्या एकुण १५० पेटया किंमत ६,००,०००/- रु आणि गुन्हयात वापरलेली पिकअप वाहन किंमत १५,००,०००/- रु. व आरोपीचा मोबाईल असा एकुण २१,१५,०००/- रुपयाचा माल जप्त करण्यात आला असुन आरोपी वाहन चालक नामे सागर अशोक परदेशी वय २७ वर्ष रा. भडगांव ता. चाळीसगांव जि. जळगाव यास अटक करुन त्याचे आणि पाहिजे असलेले आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन वरोरा येथे अपराध क्रमांक ४८०/२०२५ कलम १२३, ३१६, ३१८, ३४०, ४९ भारतीय न्याय संहिता-२०२३ सहकलम ६५ (ए) (ई), ८३, ९० महाराष्ट्र दारुबंदी कायदान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास वरोरा पोलीस करीत आहे. सदरची कारवाई मुम्मका सुदर्शन, पोलीस अधीक्षक चंद्रपूर, ईश्वर कातकडे, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर चे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचे नेतृत्वात सपोनि दिपक कॉक्रेडवार, बलराम झाडोकार, पोउपनि विनोद भुरले, संतोष निंभोरकर, सर्वेश बेलसरे, सुनिल गौरकार, पोहवा सुभाष गोहोकार, सतिश अवथरे, रजनिकांत पुठठावार, दिपक डोंगरे, इमरान खान, पोअं किशोर वाकाटे, नितीन रायपुरे, सुमित बरडे, हिरालाल गुप्ता, संतोष येलपुलवार, सचिन गुरनुले, नितीन कुरेकार, मिलींद जांभुळे, चेतन गज्जलवार, प्रफुल्ल गारगाटे, दिनेश अराडे रिक्षब बारसिंगे सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.

## गणेशोत्सवानिमित्त दिवा रेल्वे स्थानकातून कोकणात जाण्यासाठी विशेष रेल्वे गाड्या सुटणार

### मनसेचे माजी आमदार राजूदादा पाटील यांच्या प्रयत्नांना यश



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, डोंबिवली (ठाणे) :** महाराष्ट्र नवनिमर्ण सेनेचे नेते माजी आमदार राजूदादा (प्रमोद) पाटील यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून गणेशोत्सव निमित्ताने कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी मध्य रेल्वेच्या वतीने दिवा रेल्वे स्थानकावरून विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत. दिनांक २२ ऑगस्ट २०२५ ते १० सप्टेंबर २०२५ दरम्यान गाड्या सोडण्यात येणार आहे. १०६३ अप आणि १०६४ डाऊन अशा क्रमांकाच्या १९ जोडी (एकूण ३८ फेऱ्या) विशेष गाड्या असतील या गाड्यांसाठी खठउढउ मोबाईल ॲप किंवा www.irctc.co.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन आरक्षण करता येईल. याशिवाय, दिव्याजवळील कल्याण, ठाणे आणि मुंब्रा येथील आरक्षण खिडकीवर प्रत्यक्ष तिकीट आरक्षणाची सुविधा देखील उपलब्ध करण्यात आलेली आहे. दिवा वासीयांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि गणेशोत्सवासाठी कोकण प्रवास सुखकर करावा ही विनंती असे महाराष्ट्र नवनिर्माण सेना माजी आमदार राजूदादा पाटील यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## सुखेड येथे माती - पाणी परीक्षण कार्यक्रम संपन्न




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०२, खंडाळा (सातारा) :** फलटण येथील श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत सुखेड गावात माती व पाणी परीक्षण कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे उद्यान दूत विश्वजीत तोरडमल, विनायक पवार, क्षितिज जंगम, संकेत बारडोल, रिषभ काळे आणि उत्कर्ष कदम यांनी केले. या कार्यक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना माती व पाणी परीक्षणाचे महत्त्व समजावून सांगणे हा होता.मातीतील पोषणद्रव्यांचे प्रमाण, त्यातील कमतरता व जमिनीच्या पोत सुधारण्याचे उपाय याबाबत माहिती देण्यात आली. योग्य पद्धतीने माती व पाण्याचे परीक्षण करून पिकांचे उत्पादन वाढवता येते, यावर भर देण्यात आला. कार्यक्रमात डॉ.प्राजक्ता मेटकरी (माती व पाणी परीक्षण तज्ज्ञ) यांनी माती परीक्षण म्हणजे काय?, त्याचे फायदे काय आहेत? तसेच जमिनीची पोत सुधारण्यासाठी घ्यावयाची उपाययोजना यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन ही केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये रविंद्र धायगुडे(सरपंच), डॉ.बापूराव चोपडे (कृषी शास्त्रज्ञ), प्रगतशील शेतकरी संग्राम धायगुडे, ओंकार चोपडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. निंबाळकर, डॉ.यु.डी.चव्हाण,कार्यक्रम अधिकारी डॉ.जे.व्ही.लेंभे, डॉ.ए.के. अभंगराव तसेच समन्वयक प्रा.ए.डी.पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी शेतकऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि भविष्यात अशा प्रकारचे प्रशिक्षण व माहितीपर कार्यक्रम नियमितपणे व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## शासनाच्या नावाखाली दहीहंडी गोविंदा विमा योजनेत गोंधळ - शासन की असोसिएशनचा खेळ?

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, ठाणे :** दहीहंडी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि परंपरेचा मानबिंदू असलेला सण आहे. या सणाला नवे रूप, नवा उत्साह देण्याचे कार्य धर्मवीर आनंद दिघे साहेबांनी केले होते. त्यांनी दहीहंडी सणाला एक सांघिक ऐक्याचा आणि पराक्रमाचा उत्सव म्हणून समाजासमोर उभा केला. त्यामुळेच आज हा सण लाखो भाविकांच्या भावनांचा केंद्रबिंदू बनला आहे. गोविंदांच्या सुरक्षेसाठी शासनाने मोफत अपघाती विमा योजना राबवणे हा स्वागतार्ह निर्णय आहे. मात्र, प्रत्यक्षात या योजनेसाठी तयार करण्यात आलेला फॉर्म अत्यंत किचकट, अव्यवहार्य आणि लहान-मोठ्या गोविंदा पथकांसाठी अन्यायकारक आहे. या फॉर्ममध्ये एकाच फॉर्ममध्ये दोन वेळा



MRDGA GOVINDA INSURANCE 2025

महाराष्ट्र शासनामार्फत महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन (MRDGA) च्या वतीने, दहीहंडी 2025 साठी गोविंदांसाठी मोफत अपघाती विमा योजना राबवण्यात येत आहे.

कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा आणि त्यानुसार फॉर्म भरावा:

✅ योग्य व वैध माहितीच नमूद करावी. चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिल्यास विमा अर्ज अमान्य केला जाऊ शकतो.

✅ पथकातील सर्व गोविंदांच्या नावांची यादी (मुलनिहाय) PDF स्वरूपात तयार करून फॉर्ममध्ये अपलोड करावी.

ही PDF फाईल 1MB पेक्षा मोठी नसावी.

नोंदणीची अंतिम तारीख

सूचना:

ही विमा योजना दहीहंडी काळात गोविंदांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्वपूर्ण पाऊल आहे.

सर्व पथकांनी ही नोंदणी वेळेत पूर्ण करून लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

"गोविंदा आला रे" – सुरक्षिततेसह उत्सव साजरा करूया!

मंडळाचे नाव, दोन मोबाईल नंबर आणि दोन ईमेल आयडी मागण्याचा अर्थ काय? हे फक्त गोंधळ निर्माण करणारे आहे. प्रत्येक फील्डवर स्टार मार्क ठेवून जबरदस्तीने सर्व माहिती भरण्यास भाग पाडले जात आहे. एखाद्या माहितीचा अभाव असल्यास फॉर्म नाकारला जाणार का? मग गरीब आणि ग्रामीण भागातील पथकांचे काय?

मंडळाच्या लेटरहेडवरचा अर्ज आणि सर्व गोविंदांची यादी फक्त १ MB च्या PdF मध्ये अपलोड करण्याची अट हास्यास्पद आहे. ग्रामीण भागातील मंडळांकडे अशी तांत्रिक साधने नसताना एवढ्या गुंतागुंतीच्या अटी लादणे म्हणजे सणाच्या आनंदावर पाणी फेरणे. ही योजना शासनाच्या निधीतून राबवली जात आहे, तर एवढ्या किचकट अटी असोसिएशनकडून का घालण्यात येत आहेत? हे स्पष्टीकरण सरकारने द्यावे.

यासंदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे यांनी इशारा दिला आहे की, दहीहंडी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सण आहे, तो कोणत्याही बोगस नियमांच्या जोखडात अडकवू नका. गोविंदांचा विमा हा हक्क आहे, उपकार नाही. शासनाने तात्काळ या फॉर्ममधील गुंतागुंतीच्या अटी रद्द करून ओरिएंटल इन्शुरन्स कार्यालयात एक खिडकी योजना चालू करावी व सोपी प्रक्रिया लागू करावी, अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरून आंदोलन करेल आणि शासन तसेच असोसिएशन जबाबदार राहतील.

दही हंडीचा आनंद, गोविंदांची सुरक्षा - हीच खरी प्राथमिकता असावी. नियमांच्या नावाखाली सणाचे स्वरूप बिघडवण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या विचारांचा मान ठेवत हा सण पूर्वीप्रमाणे आनंदात पार पडला पाहिजे. असे मत केदार दिघे यांनी मांडले आहे.

## राज्यात ‘हर घर तिरंगा’ अभियानाची सुरूवात

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, ठाणे :** देशभरात देशभक्तीचे वातावरण निर्माण व्हावे, राज्य स्तरापासून गाव पातळीपर्यंत तिरंगामय वातावरण व्हावे, या उद्देशाने २ ते १५ ऑगस्ट पर्यंत राज्यात ‘हर घर तिरंगा’ अभियान राबविण्यात यावे, अशा सूचना सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिल्या.केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे ‘हर घर तिरंगा’ अभियान राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये राबविला जाणार आहे. यासंदर्भात सचिव डॉ.कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली.

या बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, उपसचिव महेश वाव्हळ, सांस्कृतिक कार्य संचालक विभिषण चवरे, राज्य मराठी विकास संस्थेच्या उपसंचालक अंजली ढमाळ तसेच दूरदृष्यसंवाद प्रणालीद्वारे ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले तसेच विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.राज्यात मागील ३ वर्षापासून ‘हर घर तिरंगा’ अभियान राबविण्यात येत आहे. यावर्षीचे अभियान तीन टप्प्यात राबविण्यात येत असल्याचे सांगून सचिव डॉ.कुलकर्णी म्हणाले की, पहिला टप्पा २ ते ८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत




राबविला जाईल.

दुसरा टप्पा ९ ते १२ ऑगस्ट २०२५ तर तिसरा टप्पा १३ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात ‘हर घर तिरंगा’ अभियानाच्या माध्यमातून तिरंगामय वातावरण निर्मिती व्हावी, यासाठी महत्त्वाच्या ठिकाणी दृश्य माध्यमांचा वापर करण्यात येणार आहे. आपल्या भारतीय राष्ट्रध्वजाची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी तिरंगा स्वयंसेवक यांची नोंदणी करून उत्कृष्ट काम केलेल्या स्वयंसेवकांना प्रमाणपत्र देणे, शाळेच्या भिंतीवर तिरंगाचे चित्र काढणे, तिरंगाविषयक बाबींचे प्रदर्शन भरवणे, रांगोळी स्पर्धा आयोजित करणे, माय गर्व्हमेंट या संकेतस्थळावर प्रश्नमंजूषेत सहभागी होण्यासाठी जनतेला आवाहन करणे, तिरंगा राखी तयार करण्याची स्पर्धा आयोजित करणे असे विविध स्पर्धात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याचबरोबर शाळा तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्याकडून पत्रलेखन करून ते जवान, पोलीसांना पोस्टल सेवेद्वारे पाठविणे. स्वत:चे घर, आजुबाजूचा परिसर, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविणे, तिरंगाची रोषणाई आणि लाईटिंग करणे असे विविध उपक्रम २ ते ८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार असल्याचे सचिव डॉ.कुलकर्णी यांनी सांगितले.

दुसऱ्या टप्प्याची सुरूवात ९ ऑगस्टपासून होत असून यात ‘तिरंगा महोत्सव’ राबविला जाईल. त्याचबरोबर तिरंगा मेळावा आणि तिरंगा कॉन्सर्ट कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत, असे सांगून सचिव डॉ.कुलकर्णी म्हणाले की, तिरंगा मेळाव्याचे आयोजन राज्यात होणाऱ्या सरस महोत्सवासारखे करण्यात येणार आहे. यात तिरंगाचे प्रदर्शन आयोजित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सर्वांना सहज आणि सुलभरित्या तिरंगा उपलब्ध व्हावा, यासाठी महिला बचत गटाकडे तिरंगा निर्मिती व विक्रीचे काम देण्यात यावे. जिल्हा व गाव पातळीवर तिरंगा बाईक रॅली किंवा सायकल रॅलीचे आयोजन करण्यात यावे. त्याचबरोबर या कालावधीत प्रत्येकांच्या हातात तिरंगा देऊन तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात यावे. या मोहिमेत राज्यातील प्रत्येक विद्यार्थी, तरूण-तरूणी आणि नागरिक यांचा सहभाग वाढवून मनुष्यसाखळी तयार करावी तसेच मोठ्या प्रमाणावर देशभक्तीपर गीते आणि राष्ट्रगीते लावण्यात यावी, असेही डॉ.कुलकर्णी यांनी यावेळी सांगितले. तिसरा टप्पा १३ ऑगस्टपासून सुरू होणार असून यात प्रत्येक घर, कार्यालय, वाहने यावर तिरंगा ध्वज फडकविण्यात येणार आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढवा यासाठी ध्वजारोहणच्या सेल्फी काढून केंद्र शासनाच्या www.harghartiranga.com या संकेत स्थळावर अपलोड करण्याबाबत आवाहन करण्याच्या सूचना सचिव डॉ. कुलकर्णी यांनी दिल्या.

## अहिल्यानगरमध्ये केंद्रीय विश्वविद्यालयाची स्थापना करा; लंकेचे केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना साकडे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** लोकसभा मतदारसंघात केंद्रीय विश्वविद्यालयाची स्थापना करण्याची मागणी करत खासदार निलेश लंके यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे प्रस्ताव सादर केला. महाराष्ट्रात सर्वसामान्यांसाठी एकही केंद्रीय विश्वविद्यालय नसताना खासदार लंके यांनी अहिल्यानगरमध्ये केंद्रीय विश्वविद्यालय स्थापना करण्याची औपचारिक मागणी केली आहे. दरम्यान काही दिवसापूर्वी नगर शहरात एक मेडिकल कॉलेज सुरु व्हावे. या

मागणीसाठी देखील लंके यांनी पाठपुरावा केला होता. आता त्यानंतर पुन्हा एकदा त्यांनी शिक्षण क्षेत्रासाठी एक प्रमुख मागणी केली आहे.

अहिल्यानगरमध्ये केंद्रीय विश्वविद्यालय सुरू करण्यात यावे, अशी मागणी लंके यांनी गेल्या अर्थसंकल्पीय



> विद्यापीठाच्या अभावामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठ्या शहरांकडे स्थलांतर करावे लागते. त्यामुळे आर्थिक भार वाढतोच, परंतु मानसिकदृष्ट्या अनेक अडचणी निर्माण होतात. केंद्रीय विद्यापीठ स्थापन झाल्यास विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण स्थानिक पातळीवरच उपलब्ध होईल. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास सुनिश्चित होईल.
>
> **- निलेश लंके, खासदार**

अधिवेशनातही केली होती. दरम्यान सध्या सुरू असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने खासदार लंके हे दिल्लीमध्ये आहे. विश्वविद्यालयाची मागणी करतच लंके यांनी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांची भेट घेतली. लंके यांनी मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना निवेदन ही सादर केले आहे. संबंधित प्रस्तावात म्हटलंय की, शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राचा कणा मानला जातो. अहिल्यानगर जिल्ह्यात विद्यार्थ्यांची संख्यात्मक वाढ आणि उच्च शिक्षणाची गरज लक्षात घेता, एका केंद्रीय विश्वविद्यालयाची स्थापना ही काळाची गरज आहे. महाराष्ट्रासारख्या विकसित राज्यात अद्याप एकही केंद्रीय विश्वविद्यालय नाही. वर्ध्यातील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ फक्त भाषिक अभ्यासापुरते मर्यादित असल्याकडेही खासदार लंके यांनी लक्ष वेधलं आहे. लंके यांनी कर्नाटकातील गुलबर्गा, केरळातील कासारगोड, गुजरातमधील मोसमपुरा, राजस्थान मधील अजमेर येथे यशस्वीरीत्या स्थापन झालेल्या केंद्रीय विश्वविद्यालयाचें उदाहरण देत सांगितले की, अहिल्यानगर सारख्या शैक्षणिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या जिल्ह्यातही अशीच शैक्षणिक सुविधा असणे आवश्यक आहे.

## मांडवे खुर्द येथे आरोग्य शिबीर संपन्न

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील मांडवे खुर्द येथे लोकनेते खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रविंद्रशेठ राजदेव यांच्या संकल्पनेतून मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर कॅम्पचे उद्घाटन सरपंच कैलास गागरे यांच्या शुभहस्ते करण्यात



आले. यावेळी निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष रविंद्र राजदेव, राजूशेठ गागरे, गौतम बागुल, नामदेव गागरे, निलेश लंके प्रतिष्ठानचे यशवंत जाधव, नामदेव आहेर, सोपान आहेर, रेवणनाथ गागरे, बबन जाधव, सुधीर जाधव, संतोष बागुल, ह.भ.प लक्ष्मण महाराज गागरे, दत्ताराम आहेर, कानिफनाथ क्षीरसागर, तुकाराम जाधव, मंगल हरदे, नर्मदा भोर, हिरा गागरे, डॉ सुधाकर साळुंखे, डॉ.बाबासाहेब चेडे, डॉ.गणेश हनुमंते, डॉ.पल्लवी शिंदे, गौरव बाचन, आरोग्यमित्र प्रवीण शिंदे उपस्थितीत होते. या शिबिरात अनेक रुग्णांनी सहभाग घेतला.

# कांदा भाववाढीसाठी सरकार सकारात्मक - आ. दाते

## निघोज येथील अन्नत्याग आंदोलन स्थगित

अक्षराज : वसंत रांधवण

दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) : कांदा भाव वाढीसाठी सरकार सकारात्मक असून निर्यात बंदी उठवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. लवकरच कांद्याचे दर वाढतील, असा विश्वास आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केला. निघोज येथे आपली माती आपली माणसं संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण आणि शिवसेना (उबाठा गट) निघोज पंचायत समिती गणप्रमुख महेंद्र पांढरकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले अन्नत्याग आंदोलन गुरुवारी सायंकाळी आमदार दाते यांनी दिलेल्या आश्वासनानंतर त्यांच्या हस्ते लिंबूपाणी घेऊन सोडण्यात आले.

शेतमालाला हमीभाव, कर्जमाफी आणि कांदा निर्यातबंदी उठवावी यांसारख्या मागण्यांसाठी हे अन्नत्याग आंदोलन निघोज एसटी स्थानक परिसरात चार दिवस सुरु होते.आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार दादाभाऊ कळमकर आणि दीपक अण्णा लंके यांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. यावेळी आमदार दाते म्हणाले, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पणन मंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याशी मी थेट संपर्क साधून या आंदोलनाची सविस्तर माहिती दिल्याचे सांगितले.

कांदा प्रश्न राज्यासाठी अत्यंत संवेदनशील असून निर्यातबंदी लवकरच उठवण्यासाठी केंद्र व राज्य सरकार सकारात्मक आहे. कर्जमाफीबाबत ही सरकारची भूमिका सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दीपक आण्णा लंके यांनी खासदार डॉ. नीलेश लंके कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संसदेत आवाज उठवत असून त्यांना योग्य न्याय मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत, अशी माहिती दिली.

त्यांनी अन्नत्याग आंदोलनाचे कौतुक करताना यामागील शेतकरीहिताच्या भूमिकेचे समर्थन केले. यावेळी उपोषणकर्ते रुपेश ढवण, महेंद्र पांढरकर, राळेगण थेरपाळचे सरपंच पंकज कारखिले, देवराम लामखडे, उत्तम लामखडे, अनिल शेटे, सचिन पाटील वराळ, ज्ञानेश्वर वरखडे,वारकरी मंडळाचे अध्यक्ष बबनराव थोरात महाराज, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे रोहिदास लामखडे, संतोष रसाळ, सुधामती कवाद यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.



उपोषणकर्ते रुपेश ढवण व महेंद्र पांढरकर यांनी घेतलेली भूमिका शेतकरी हिताची असून त्यांच्या आंदोलनाला शिरूर व पारनेर तालुक्यातून भरघोस प्रतिसाद मिळाला. या मागण्या लवकरच मंजूर व्हाव्यात यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी सातत्याने संपर्कात आहे. सरकारकडूनही या विषयावर सकारात्मक पावले उचलली जात आहेत, कांदा उत्पादक शेतकऱ्यांची स्थिती आणि सरकारीची भूमिका याविषयी प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांनाही वस्तुस्थितीची माहिती आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा यासाठी आम्ही शासनाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्नशील आहोत.

**- आमदार काशिनाथ दाते**

# थोडक्यात

## महाबळेश्वर येथे अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०१, महाबळेश्वर (सातारा) :** डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया कामगार आघाडीच्या वतीने साहित्यरत्न, साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती महाबळेश्वर येथील हॉटेल साई यश येथे उत्साहात साजरी झाली. सर्वप्रथम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज राजश्री शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले तसेच विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.यावेळी उपनिरीक्षक काळे पत्रकार सादिक सय्यद, पत्रकार राहुल शेलार, हॉटेल व्यवसायिक सुर्यकांत शिंदे, युवा उद्योजक अक्षय वायदंडे, तहसीलदार कार्यालयालयातील पुरवठा अधिकारी गोसावी, कोंढाळकर इत्यादी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. ५ वर्षाच्या सोहा शेख मनोगत व्यक्त केले. यानंतर पत्रकार सादिक शेख आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेश वायदंडे यांनी केले. तसेच आपल्या भाषणात लोकशाहीर अण्णाभाऊ यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे. अशी मागणी केली. यावेळी शहराध्यक्ष महिला सैराबानु शेख, संपर्क प्रमुख नुरजाताई खारखंडे, संघटक मोहन कारंडे, मुबारक नालबंद, अख्तर महापुळे जयश्री खंडु वाघमारे, मोरे, राधा चवरे, अंजना कसबे इत्यादी सर्व डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मराठा समाजाचा ऐतिहासिक एकजूट घडविण्यासाठी खेडलेझुंगे येथे बैठक संपन्न




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०१, विंचुर (नाशिक) :** खेडलेझुंगे येथील योगीराज तुकाराम बाबा स्मारक मंदिरात मराठा समाजाची भव्य नियोजन बैठक दिनांक ०१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी उत्साहात पार पडली. या बैठकीस निफाड, येवला, सिन्नर तालुक्यांतील शेकडो मराठा बांधवांनी उत्स्फूर्त हजेरी लावत समाजाच्या एकजुटीचा निर्धार केला. या बैठकीत येत्या रविवार, दिनांक ०३ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजता होणाऱ्या मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या स्वागत सोहळ्याची तयारी अंतिम करण्यात आली. अंदाजे ५० हजारांहून अधिक जनसमुदाय या सोहळ्यासाठी उपस्थित राहील, असे आयोजकांनी सांगितले. यासाठी वाहतूक, पार्किंग, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा व सुरक्षेचे काटेकोर नियोजन करण्याचे ठरले. यासोबतच निफाड, येवला व सिन्नर तालुक्यांमध्ये जनजागृती मोहीम राबविण्याचा आणि समाजबांधवांना दिनांक ०३ ऑगस्टच्या कार्यक्रमासाठी एकत्र आणण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बैठकीस प्रवीण कदम यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रसाद फापाळे, अभिजित डुकरे, राजेश भडांगे, राहुल वाघ, धर्मराज घोटेकर, विजय गिते, राहुल घोटेकर, गणेश गोरडे, अजय सदाफळ, अजिंक्य साबळे, अमोल मेमाणे, कल्पेश वायकर, भैय्या घोटेकर, अनिकेत साबळे, सागर भारस्कर, नारायण सदाफळ, ऋषी घोटेकर, अनिल सदाफळ, बाबा गोसावी, प्रदीप परदेशी, निलेश घोटेकर, सागर सदाफळ, शरद गिते, सुनील माळी, विठ्ठल बेर्डे, विष्णू मेमाणे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून संयोजनात योगदान दिले. आपली पाऊलेच आपली ताकद, आपली उपस्थितीच आपला विजय या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. युवकांची ऊर्जा, महिलांची तयारी आणि ज्येष्ठांचा पाठिंबा यामुळे ३ ऑगस्टचा कार्यक्रम मराठा समाजाच्या ऐतिहासिक एकतेचा पुरावा ठरेल, असा ठाम विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# भिंगार शहरासाठी उड्डाणपूलाची गरज

## खा.लंके यांनी वेधले मंत्री नितीन गडकरींचे लक्ष

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील ऐतिहासिक व लष्करी वारसा लाभलेले भिंगार शहर सध्या अत्यंत गंभीर आणि दिर्घकालीन वाहतूक समस्येच्या विळख्यात अडकले आहे. या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधी म्हणून सामाजिक जाणीवेने काम करणारे खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नीतीन गडकरी यांची भेट घेऊन भिंगार येथे उड्डाणपूल बांधण्याची आग्रही मागणी केली.

यासंदर्भात खा. लंके यांनी मंत्री गडकरी यांना निवेदनही सादर केले असून त्यात नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ हा अत्यंत महत्वाचा महामार्ग भिंगार शहराच्या मध्यातून जातो. विशेषतः भिंगार नाला ते विजय लाईन चौक व भिंगार अर्बन बँक ते महात्मा फुले पतसंस्था या मार्गावर सततची वाहतूक कोंडी अनुभवायला मिळते.

दैनंदिन वाहतूक समस्येमुळे शालेय वेळेत विद्यार्थ्यांना वेळेवर पोहचण्यास अडचणी निर्माण होतात. रुग्णवाहिका वाहतूकीच्या कोंडीत अडकून त्यांना वेळेवर रूग्णालयात पोहचता येत नाही. स्थानिक व्यापाऱ्यांच्या व्यवसायातील अडचणी बरोबर वाहन चालक व पादचाऱ्यांमध्ये दररोजच तणावपूर्ण वातावरण असल्याचे ही खा. लंके यांनी निदर्शनास आणून दिले.

भिंगार शहर हे अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघाचा एक महत्वाचा भाग असून त्याला ऐतिहासिक, लष्करी आणि नगरी वारसा लाभलेला आहे. येथे आजही मोठया प्रमाणावर छावणी क्षेत्र, शासकीय कार्यालये, बँका, शाळा, रूग्णालये आणि



व्यापारी प्रतिष्ठाने कार्यरत आहेत. तर दुसरीकडे शहराच्या रस्त्यांचा आराखडा मात्र आजही जुनाच आहे.

त्यामुळे वाढत्या लोकसंख्येला आणि वाहनांच्या संख्येला तो झेपेनासा झाला आहे. वाहतूक कोंडीमुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.

# हवामान बदलाला सामोरे जाण्यासाठी मनपाचे पाऊल

## ‘आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया’ शी करार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** हवामान बदलामुळे वाढता धोका लक्षात घेता महानगरपालिका आणि आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया यांच्यात करार करण्यात आला असून, उष्णता आणि पूर यासारख्या अडचणींवर उपाय शोधले जाणार आहेत. टाटा ट्रस्ट या उपक्रमासाठी पाठबळ देत असून, यात स्थानिक लोकांचा सहभाग आणि शाश्वत (टिकाऊ) शहर विकास यावर भर दिला जाणार आहे.

या सहकार्याअंतर्गत सार्वजनिक ठिकाणी हवामानाशी जुळणारे बदल करणे, जसे की अतिउष्णता किंवा अतिवृष्टी यामुळे पुराचा धोका ओळखणे, नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन उपाययोजना करणे आदी अनेक कामे




केली जातील. त्याचप्रमाणे २०० हून अधिक गरजू कुटुंबांची घरांमध्ये उष्णता कमी करणाऱ्या उपायांचा अवलंब केला जाईल, जे उन्हाळ्यात घराचे तापमान कमी करण्यात मदत करतील. त्याच्या परिणामाचा अभ्यास करुन इतरांना या उपाययोजनाबाबत मार्गदर्शन केले जाईल.

जमिनीचे तापमान, अधिक वेळ टिकून राहणारी उष्णता, जोखीम मूल्यांकन व इतर नैसर्गिक संकटांचा अभ्यास करुन आवश्यक भागांमध्ये उपाय योजिले जातात. काही शाळा व महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा आणि पाण्याचा कमी वापर करणारी उपकरणे बसविण्यात येऊन हरित भाग वाढविण्यासाठी ही प्रयत्न केले जातील. पूर धोका कमी करण्यासाठी निर्णय घेता यावा म्हणून पाण्याचा प्रवाह, भूजलावर अभ्यास केला जाईल. पावसाचे पाणी मुरविण्यासाठी पेव्हर ब्लॉक्स, पुनर्भरण विहिरी असे काही प्रयोगदेखील राबविले जातील.

बैठकीला उपायुक्त संदिप चिद्रावार, डॉ.नयना उत्तरवार, डॉ.अमोल शेळके, आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडियाचे सीईओ प्रेरणा लांगा, प्रकल्प प्रमुख जुबेर शेख, प्रकल्प व्यवस्थापक विक्रांत हरंखेडे, प्रकल्प समन्वयक हर्षल बारंगे, तसेच समुदाय प्रेरक अमित नागदिवे, ऋतिक वाळके, शीतल मगार आणि योगिता खामनकर उपस्थित होते.चंद्रपूरची भौगोलिक रचना आणि नागरिकांच्या गरजांनुसार आम्हाला अशा उपायांची गरज आहे. ज्या स्थानिक पातळीवर उपयोगी पडतील व शास्त्रीय माहितीवर आधारित असतील. हा उपक्रम चंद्रपूरला एक सुरक्षित, सर्वसमावेशक, आणि हवामानदृष्ट्या मजबूत शहर बनवण्याच्या दिशेने पुढे नेईल, असे मनपा आयुक्त डॉ. विपीन पालीवाल म्हणाले.

## खामसवाडी येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०१, धाराशिव :** कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील अण्णाभाऊ साठे यांच्या चौकामध्ये साहित्याचे महामेरू, संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार, साहित्यरत्न, लोकशाहीर, डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी लाल ध्वजाचे ध्वजारोहण ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र पाटुळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर गावचे सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील, ग्रामपंचायत सदस्य किरण पाटील, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत पाटील, अजित शेळके, मानव अधिकार आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत पाटुळे यांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सचिन शेळके, पत्रकार सुनील पाटील, गोपाळ शेळके, शिवाजी बोबडे, दिपक सावत, माणिक काकडे,भिमशाहीर राजेंद्र कांबळे,भारत मगर,सावता माळी, सतिश वैद्य,श्रीमंत पाटील, यांच्या हस्ते ही महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जिवन चरित्रा विषयी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी बाळासाहेब पाटुळे,शाखा अध्यक्ष सचिन पाटुळे, महावीर पाटुळे, भिमराव कांबळे, श्रीनिवास पाटुळे, शामराव पाटुळे, भगवान पाटुळे, सुरेश पाटुळे, महादेव पाटुळे,अनिल पाटुळे,शाहु पाटुळे, धनंजय पाटुळे,संजय पाटुळे, श्रावण पाटुळे,आबाराव पाटुळे, बाबासाहेब पाटुळे, विकास पाटुळे, आकाश पाटुळे, आदेश पाटुळे,मिठु पाटुळे,राम पाटुळे,मारुती लोंढे,नाना चांदणे, भिकाजी चव्हाण, संतोष पाटुळे,शंकर राजगुरू, सुर्यकांत सौदागर,मोहन मगर,बलभिम निर्फळ, उत्तम सावंत,शंकर पाटुळे,धनंजय कांबळे,रामहारी मंडाळे, विकास कदम, दिपक ताटे यांच्या सह ग्रामस्थ व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत भाऊ पाटुळे यांनी केले तर आभार बाळासाहेब पाटुळे यांनी मानले.

## अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती भानेगांव येथे साजरी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०१, नागपूर :** लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती स्थानिक भारतीय बौद्ध महासभा, शाखा नवीन बिना भानेगाव यांच्या वतीने नविन बिना बौद्ध विहार येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तथागत गौतम बुद्ध, विश्वरत्न, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या छायाचित्रांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व बुद्धवंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे डॉ.जितेंद्र सावजी तागडे यांनी लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे लोकसाहित्य आणि महाराष्ट्राच्या पुनर्रचनेतील योगदान विशद करताना साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांवर चालण्याचे आव्हान केले.

यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे उपाध्यक्ष अनिल लांजेवार, सचिव मुकेश बागडे, कोषाध्यक्ष रवींद्र ढोके, हिशोब तपासनिस नरेश डोंगरे, सल्लागार समितीचे मनोहर गजभिये, तुळशीराम बागडे, कृष्णाजी वासनिक, ओमप्रकाश गौरकर, किशोर चव्हाण, अशोक कांबळे, आम्रपाली महिला मंडळाच्या कांता बागडे, बेबी वासनिक, गणवीर, रेखा लांजेवार, अंजना मेश्राम, सत्यभामा वासनिक, नंदा सोमकुंवर, मीना मेश्राम, प्रभा लोखंडे, निर्मला डोंगरे, कडबे ताई, लता खोब्रागडे, रुणू गोलाईत आदीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन मीना नरेश ढोके यांनी केले तर आभार पृथ्वीराज गोलाईत यांनी मानले.



## अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०१, पाटण (सातारा) :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक या दोन महामानवांचे कार्य स्वातंत्र्य लढ्यात उल्लेखनीय व समाजाला दिशा देणारे आहे.

या दोन कल्याणकारी महामानवांचा आदर्श आजच्या पिढीने घेऊन त्यांच्या विचारांचा अभ्यास करावा. हा अभ्यास विद्यार्थ्यांना प्रेरणादायी व आदर्शवत ठरेल. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी पाटण इंदिरानगर दत्त मंदिर येथे साजरी करण्यात आली.